**नगरविकास राज्यमंत्री श्री रणजित पाटील यांनी केली आझाद मैदान येथील मेट्रो 3 च्या कामाची पाहणी**

*मेट्रो 3 च्या कामाविषयी व्यक्त केले समाधान*

**मुंबई, 12 सप्टेंबर**- नगरविकास राज्यमंत्री श्री. रणजित पाटील यांनी आज आझाद मैदान येथील मेट्रो-3 च्या कामाच्या स्थळाला भेट देऊन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन राबवित असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ (मेट्रो-3) या मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो मार्गाच्या कामाचा आढावा आज घेतला व कॉर्पोरेशन करीत असलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले. आझाद मैदान येथे सध्या मेट्रो 3 च्या पॅकेज 2 च्या टीबीएम शाफटचे काम सुरू आहे.

या भेटीदरम्यान मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे यांनी आतापर्यंत झालेल्या सिकन्ट पाईल्स, प्रकल्पावरील मनुष्यबळ, प्रकल्प राबवित असताना घेतल्या जाणाऱ्या सुरक्षेच्या उपाययोजना, प्रकल्पासाठी वापरण्यात येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान आदींची माहिती नगरविकास राज्यमंत्री श्री. रणजीत पाटील यांना दिली.

डॉ. रणजित पाटील यांनी आज दुपारी संपूर्ण आझाद मैदान येथील कामाच्या स्थळाची पाहणी केली. यावेळी श्रीमती भिडे यांनी प्रकल्पासाठी लागणाऱ्या 17 टीबीएम पैकी दुसरी टीबीएम आझाद मैदान येथे पुढल्या आठवड्यात येणार असल्याचे व प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स या सर्वात महत्त्वाचा सुरक्षा विषयक तंत्रज्ञानाची माहिती दिली.या प्रकल्पावर 4000 पेक्षा अधिक मनुष्यबळ काम करत असून त्यापैकी 800 हे तांत्रिक काम करणारे मनुष्यबळ आहे.

श्रीमती अश्विनी भिडे यासंदर्भात माहिती देताना म्हणाल्या, मा. नगरविकास मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे भविष्यात आम्ही अधिक उत्तम कामगिरी करू शकू.

सध्या सुरू असलेल्या कामामुळे वाहतुकीत कमीतकमी व्यत्यय यावा यासाठी कॉर्पोरेशनचे कंत्राटदार राबवित असलेल्या वाहतूक व्यवस्थापन आराखड्याचे नगरविकास राज्यमंत्री श्री रणजित पाटील यांनी कौतुक केले.